सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-१/४५६ ठ. क्र. २३
दि. १२/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/४५६

स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत विशेष उद्देश वाहन (स्पेशल परपज व्हेईकल) च्या स्थापनेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्याकरिता सोलापूर शहराकरिता विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) च्या रचनेबाबत मा. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. स्मार्टसि-सोलापूर २०१६/प्र.क.११२/नवि-२३ यांचे दि. १४ मार्च २०१६ ची प्रत प्रस्तावासोबत जोडली असून, सदरच्या शासन निर्णयाची प्रत मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव सादर करणेस, तसेच उक्त शासन निर्णयामध्ये एस.पी.व्ही. यांच्या रचनेत महानगरपालिका, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार, स्वतंत्र संचालक यासह १५ संचालक मंडळास मान्यता देण्यात आली आहे. सदर संचालक मंडळातील विविध भागधारक यांचे संचालक मंडळातील प्रतिनिधीत्वासही शासनाने मान्यता दिलेली आहे. यामध्ये सोलापूर महानगरपालिकेचे ६ संचालक असतील. या सहा संचालकामध्ये १) महापौर २) अध्यक्ष, स्थायी समिती ३) सभागृह नेता ४) विरोधी पक्षनेता, सोलापूर महानगरपालिका असे १ ते ४ पदनिर्देशित संचालक असतील. त्याचप्रमाणे व्यापक राजकीय प्रतिनिधीत्व देण्याच्या उद्देशाने विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) वर प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक आहे. याकरिता प्रस्तावात नमूद अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशित संचालक म्हणून नियुक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/राज्य मान्यताप्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशित करण्यांत येतील, याप्रमाणे नमूद करण्यात आली आहे. तरी उक्त नमूदनुसार सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय होणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १७-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.आयुक्त यांनी दि. ३-३-२०१६ रोजी स्पेशल परपज व्हेईकल स्थापने बाबतचा निर्णय घेण्याकरिता महानगरपालिकेची विशेष सभा बोलाविण्याबाबत मा.महापौरांना पत्र दिलेले आहे. स्पेशल परपज व्हेईल स्थापन करण्याचा पुर्ण अधिकार हा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा आहे. सबब मा.सर्वसाधारण सभा .ठ.क्र. ३३९ दिनांक ८-३-२०१६ अन्वये योग्य तो ठराव केलेला आहे.

मा.आयुक्तांनी दि. ३-३-२०१६ रोजी स्पेशल परपज व्हेईकल स्थापने बाबत सर्वसाधारण सभेची विशेष सभा बोलाविण्याबाबत दिलेल्या पत्राबरोबर स्पेशल परपज व्हेईकलची रचना पाठविलेली आहे त्या रचनेप्रमाणेच महानगरपालिकेने ठराव केलेला आहे.

सल्लागार मंडळ स्थापन करुन सर्व पक्षिय गटनेते, मा.आमदार, मा.खासदार व प्रशासनाने प्रस्तावित केलेले सल्लागार समितीमध्ये आयुक्त वहातुक विभाग, डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर, पुरातत्व विभाग, अर्बन प्लॅनर,अध्यक्ष, सिध्देश्वर मंदीर समिती, अधिक्षक अभियंता,विज मंडळ, राष्ट्रीय महामार्ग एक प्रतिनिधी, नगर अभियंता,सो.म.पा, सार्व.आरोग्य अभियंता ,सो.म.पा. यांचे एक सल्लागार मंडळ नियुक्त केलेले आहे. याशिवाय या समितीमध्ये सर्व पक्षिय सभासदांना प्रतिनिधीत्व देण्यांत आले आहे.

मा.महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयात नमूद केलेले राज्य शासनाचे नामनिर्देशित संचालक १) जिल्हाधिकारी, सोलापूर,२) पोलीस आयुक्त,सोलापूर ३) सहा.संचालक नगररचना पुणे विभाग, ४) मुख्य अभियंता, सार्व.बांधकाम विभाग,पुणे आणि एस.पी.व्ही.करिता पदनिर्देशित अधिकारी, मा.आयुक्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संचालक पदावर नियुक्ती केलेली आहे त्यांना एस.पी.व्ही.च्या पहिल्या बैठकीमध्ये घेण्यास मान्यता देण्यांत येत आहे. त्यांचा समावेश यापुढे होणा-या एसपीव्ही च्या बैठकीत करण्यासही मान्यता देण्यांत येत आहे.

मा.राज्य शासनाने कोणतेही अनुदेश किंवा निर्देश देण्यापूर्वी महानगरपालिकेला असे अनुदेश किंवा निर्देश का देण्यांत येऊ नये याबाबत १५ दिवसाचे आत अभिवेदन सादर करण्याची संधी देईल अशी तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५० अ मध्ये अशी तरतूद आहे या तरतुदीप्रमाणे मा.शासनाने महानगरपालिकेला कळविले नाही. आणि मा.शासनाने मनपाने एस.पी.व्ही. संदर्भात केलेला ठराव अधिनियमातील कलम ४५१ नुसार विखंडीतही केलेला नाही. यास्तव वरील सर्व कायदेशीर बाबींचा विचार करुन मा.सर्वसाधारण सभेने केलेला ठराव क्रमांक ३३९ दिनांक ८-३-२०१६ हा कायम करण्यांत येत असून,त्यांची अंमलबजावणी मा.आयुक्त यांनी करावी. यांस मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४२४ ठ. क्र. २४
दि. १२/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोरेगांव जलशुध्दीकरण केंद्राकडे पाणी शुध्दीकरण प्रक्रियेकरिता तातडीने ५ मे. टन PAC पावडर खरेदी करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरची खरेदी तातडीची असल्याने, मक्तेदार मे. एस.व्ही.एस. केमीकल कॉर्पोरेशन पुणे यांचेकडून र.रुपये १,५५,६२५/- इतक्या रक्कमेचे खरेदी तात्काळ मुं.प्रां.महाअधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार करुन घेणेत आलेले असून, सदर बाब मा. स्थायी समितीकडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १-१-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेऊन मा.म.न.पा.कडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ६७२ दिनांक १८-२-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाला मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा. ४२५ ठ. क्र. २५ दि. २२/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



उजनी हेडवर्क्स येथे दुबार पंपींग करणेकामी र.रु. ३७,३८,००७/- च्या इस्टीमेटला ६७ (३) (क) अन्वये मान्यता मिळणेबाबत उजनी धरणाची लेव्हल आजला वजा २०.२५ % असून सदर ठिकाणी दुबार पंपींगचे काम हाती घेवून तातडीने कार्यवाही करावी लागणार असल्याने, त्यामुळे सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असलेने जाहिर प्रसिध्दीकरणाने टेंडर मागविणेत आलेले असून, प्रस्तावात नमूद कारणास्तव जाहिर प्रसिध्दीकरणाने मागविणेत आलेले टेंडर प्रकरण निर्णयास्तव असलेने उनी हेडवर्क्स येथे दुबार पंपींग करणे कामी येणारे र.रुपये ३७,३८,००७/- च्या रक्कमेच्या इस्टीमेटला मुं.प्रां.महा.अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये कोटेशन कार्यवाहीची मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ११-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. स्थायी समिती ठराव क्र. ६७१, दिनांक २६-२-१६ ने मा.म.न.पा.कडे माहितीस्तव शिफारसीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/कायमी/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.३७४ ठ. क्र.२६ दि. २१/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बेलाटी गावातील शालेय मुलींना शालेय शिक्षणासाठी मोफत सिटी बस सुविधा देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव बेलाटी ता.उत्तर सोलापूर गावातील मुलींची आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना पूर्ण शिक्षणाचा लाभ घेता येत नाही. सबब बेलाटी ता.उत्तर सोलापूर या गावातील इ.१ ली ते १० वी शिकणाऱ्या मुलींना मोफत बस प्रवास पास देण्याची कार्यवाही ठेवण्यास, सदर पासेसच्या नोंदी घेऊन रक्कमेची मागणी करण्यास मान्यता मिळणेकामी मा.परिवहन समिती यांचे शिफारशीने मा.सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव सादर करणेकामी मा.परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक १.९.१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. परिवहन समिती ठराव क्र. ६८, दिनांक ६-१०-२०१५ अन्वये मा. महिला व बाल कल्याण अधिकारी यांचे अभिप्रायासह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे असा ठराव पारित झालेला असून त्यास अनुसरुन मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक १-३-२०१६ चे टिपणीमध्ये सविस्तर माहिती सादर केले असून, मौजे बेलाटी, ता. उ. सोलापूर या गावातील इ. १ ली ते १० वी पर्यंत शिकणा-या किमान ५० शालेय मुलींना मोफत बसप्रवास पासेस द्यावयाचे झाल्यास प्रति लाभार्थी वार्षिक रुपये ५०००/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त) पर्यंत सवलत द्यावी लागणार आहे. याकरिता मा. महानगरपालिकेच्या **अ** अंदाजपत्रकात इ. १ ली ते १० वी मुलींना मोफत बस सेवा पुरविण्याकामी उपक्रमासाठी मागणी केलेप्रमाणे २ कोटी अधिक (+) रक्कम रु. २,५०,०००/- ची स्वतंत्र तरतूद होवून मिळाल्यास मोफत बस सेवा देणे शक्य होणार आहे. तरी या सर्व बाबींचा विचार होवून मौजे बेलाटी ता. उत्तर सोलापूर या गावातील इ. १ ली ते १० वी पर्यंत शिकणा-या मुलींना मोफत बस प्रवास देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. परिवहन समिती यांचे शिफारसीने मा. सर्वसाधारण सभेकडे सादर करणेबाबत मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दि. १-३-२०१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन करुन मा. परिवहन समिती ठराव क्र. १२७, दिनांक १५-३-२०१६ अन्वये इयत्ता १ ली ते १० वी मुलीकरिता महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून परिवहन उपक्रमाने प्रस्तावित केलेप्रमाणे र.रु. २,५०,०००/- दरवर्षी परिवहन उपक्रमास आदा केल्यास सदरची योजना राबविता येईल. याप्रमाणे मान्यता मिळणेस्तव मा.म.न.पा.कडे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

तरी सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचे बसेस ज्या ज्या गांवापर्यंत सेवा देते त्या गावामधील १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थीनींची संख्या,शाळेचे नांव विध्यार्थिनीचे नांव व अधिकृत पत्ता इत्यादी तपशीलवार माहितीसह व येणा-या खर्चास,प्रकरणं मा.सर्वसाधारण सभेकडे फेर विचारार्थ सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.४४६.ठ. क्र.२८८ दि.१२/५/१६.....रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



इ. १ ली ते १० वी शिकणा-या कुंभारी विडी घरकुल (गोदुताई घरकुल) या भागातील मुलींना मोफत बस प्रवासाचे सवलत देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे लाभार्थी मुलींची संख्या किमान १०९ इतकी असून प्रती लाभार्थी रु. ५०००/- प्रमाणे वार्षिक रु. ५,४५,०००/- इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे. उपक्रम सध्या नुकसानीत असल्याने सदरहू रक्कम रु. ५,४५,०००/- इतकी म.बा.क.स. म.न.पा. यांनी रक्कम उपलब्ध करुन दिल्यास पास देणे योग्य वाटते. यास्तव मा. परिवहन समितीच्या शिफारसीने मा. सर्वसाधारण सभेकडे धोरणात्मक निर्णय होवून मान्यता मिळणेकामी मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दि. ४-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन करुन मा. परिवहन समिती ठराव क्र. १२८, दिनांक १५-३-२०१६ अन्वये इयत्ता १ ली ते १० वी मुलीकरिता महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून परिवहन उपक्रमाने प्रस्तावित केलेप्रमाणे र.रु. ५,४५,०००/- दरवर्षी परिवहन उपक्रमास आदा केल्यास सदरची योजना राबविता येईल. याप्रमाणे मान्यता मिळणेस्तव मा.म.न.पा.कडे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

तरी सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचे बसेस ज्या ज्या गांवापर्यंत सेवा देते त्या गावामधील १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थीनींची संख्या,शाळेचे नांव विध्यार्थिनीचे नांव व अधिकृत पत्ता इत्यादी तपशीलवार माहितीसह व येणा-या खर्चास,प्रकरण् मा.सर्वसाधारण सभेकडे फेर विचारार्थ सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.जं....../...... ठ. क्र....२५.... दि...१२/४/१६... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-२/४५७

सोलापूर महानगरपालिकेच्या जागेत, इमारतीवर, चौकात मोबाईल टॉवर उभारणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे रिलायन्स जियो कंपनी व इंडस टॉवर कंपनी यांचेकडून मोबाईल टॉवर उभे करणेपोटी मनपास यातून १) डिपॉझीट २) टॅक्स ३) जागेचे भाडे ४) सदर मोबाईल टॉवरवर हायमास्ट पध्दतीचे दिवे किंवा आवश्यक त्या ठिकाणी विशेष बाब म्हणून सीसी टीव्ही कॅमेरे विनामुल्य लावून मिळणार आहेत. तसेच इंडस टॉवर या कंपनी शहरात सुलभ शौचालय विनामुल्य बाधून त्यावर टॉवर अशा पध्दतीने डिझाईन सादर केले आहे. त्यामुळे शहरातील आवश्यक त्या ठिकाणी महिलांकरिता विनामुल्य सुलभ शौचालय सदर कंपनीकडून बांधून घेता येवू शकेल. तसेच टॉवर विथ बसस्टॉप अशा पध्दतीचे आधुनिक डिझाईनही सदर कंपनीने दिले आहे. प्रस्तावात नमूद वस्तुस्थितीचा विचार करता यापूर्वीचे प्रस्तावातील नमूद बाबी पाहता आजमितीस मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज पाहता अशा प्रकारे उत्पन्न वाढविण्याचे इतर उपायाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असून यामुळे मनपास अशा टॉवर उभारणीतून विविध मार्गाने कायमचे उत्पन्न मिळविता येवू शकेल. तरी सोलापूर शहरात मनपाच्या मालकीच्या जागेवर चौकात, स्मशानभूमीत, गाळेवर देणे उचित होईल त्याकरिता महाराष्ट्र अध्यादेश सन २०११ मधील तरतुदीचा वापर करुन त्यास मानीव मंजूरी घेता येणार नाही, त्याअनुषंगाने सदर बाबत पुनःश्च मंजूरी मिळणेकरिता मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळून सदरबाबत सर्व निर्णय घेणेसाठी अधिकार मा. आयुक्त यांना देणेस मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १८-३-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेत, इमारतीवर, चौकात मोबाईल टॉवर उभारणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे १) डिपॉझीट २) टॅक्स ३) जागेचे भाडे ४) सदर मोबाईल टॉवरवर हायमास्ट पध्दतीचे दिवे किंवा आवश्यक त्या ठिकाणी विशेष बाब म्हणून सीसी टीव्ही कॅमेरे विनामुल्य लावून घेणेस तसेच सुलभ शौचालय विनामुल्य बांधून घेणेस धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे. आणि सोलापूर महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन वाढीचे दृष्टीने परसाईड, प्रति महिना कमीत कमी रुपये ६,५००/- किंवा त्यापेक्षा जास्त भाडे आकारणी करुन सोलापूर महानगरपालिकेच्या जागेत मोबाईल टॉवर उभे करणेस धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे.

तसेच ३ वर्षे झाल्यानंतर नियमानुसार अस्तित्वात असलेले भाडे दरावर १०%भाडेवाढ करुन होणारे भाडेदर म्हणून आकारुन भाडेपट्टयाने देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.जा. ...नाने३/मू.ठ. क्र. ....२९ दि. १२/५/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-३/४५८

नेहरु नगर येथील शासकीय मैदानामध्ये विविध सुविधा करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा.म.न.पा.ठराव क्र. १७१, दि. २९-९-२०१५ अन्वये याबाबत संपूर्ण माहितीसह १५ दिवसात मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत आलेली असून त्यास अनुसरुन प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, विषयांकित नमूद कामाकरिता पूर्वगणनपत्रक क्र. २१/सन २०१५-१६ र.रु. २,०६,६२,११९/- इतक्या रकमेचे तयार करण्यात आले असून सदर पूर्वगणनपत्रकास अंतिम मान्यता मिळणेस्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. १८-३-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ 639 ठ. क्र. 30
दि. 12/5/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



स्पे.दरखास्त नं. २६-२०13 मधील मे. न्यायालयाने दिलेले आदेश टी.पी.४ फा.प्लॉट नं. १२३ आरक्षण क्र. १/३४ बागेसाठी आरक्षित जागेबाबत (माटे गार्डन) प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरची जागा बी.ओ.टी. तत्वावर देणेची झाल्यास प्रथम सदर जागेवरील आरक्षण मा. शासनाकडून रद्द, या आरक्षणामध्ये बदल करावे लागणार आहे. सदर कामास वेळही लागणार आहे. परिणामी सदर कामाचे नुकसान भरपाई देणेबाबतची रक्कमेमध्येही मोठी वाढ होऊ शकते. तसेच सन २०१५ च्या शिघ्रसिध्दगणकानुसार सदर जागेची किंमत रु. ४९८०/- प्रती चौ.मी. इतकी आहे एकूण बागेसाठी संपादित क्षेत्र ११९००.०० चौ.मी. इतकी आहे. त्यानुसार चालू शिघ्रसिध्दगणकानुसार सदर जागेची किंमत ( ११९००.०० चौ.मी. x ४९८० ) = ५,९२,६२,०००/- इतकी होते. परंतू मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेनुसार निवडयाची रक्कम व्याजासहित आजतागायत अंदाजे ७ कोटीच्या जवळपास आहे. तरी प्रस्तावात नमूद वस्तुस्थितीचा विचार होवून बागेसाठी संपादित जागेच्या नुकसान भरपाई देणेकरिता बजेट उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ६-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरचे रक्कम जिल्हा नियोजन विकास मंडळाचे अनुदानातून आदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४५० ठ. क्र. ३९
दि. १२/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बाळे गांव येथील बाळे कॉर्नर याठिकाणी असलेल्या चौकास राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ४३३ ठ. क्र. ३२ दि. ९२/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. संजय भगवान जगताप, वसूल क्लार्क मंडई विभाग, सो.म.पा. यांचे विरुध्द दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव श्री. जगताप यांनी गहाळ दर्शविलेल्या पावत्यांमधील एकूण २४ पावत्या हया विविध दुकान गाळेधारकांना देवून त्यांच्याकडून भाडयाची एकूण रक्कम रु. २७,१४३/- वसूल करुन घेवून ती रक्कम शासन जमा न करता ती स्वत:करता वापरुन शासकीय रक्कमेचा अपहार केल्याचे दिसून आल्याने श्री. जगताप यांचेविरुध्द मे. न्यायालयात दोषारोप पत्र पाठविणेस मंजूरी दिली असून, सदरची बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५९-अ मधील तरतूदीनुसार मा. महानगरपालिकेस कळविणेबाबत मा. आयुक्त यांचे दि. २३-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ४३० ठ. क्र. ३३ दि. २१/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ४५ वजीर नगर मिल्लत नगर व मदनी नगर येथे पाण्याची पाईप लाईन टाकणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयांकित कामाचे सविस्तर पूर्वगणनपत्रक क्र. र.रु. ३०,५१,४३१/- इतक्या रकमेची तयार करणेत आले असून याकामी प्रकरणी बजेट तरतूद उपलब्ध नसल्याने सन २०१५-१६ पाण्याची पाईप लाईन घालणे व टाक्या बांधणे या तरतूदी मधून उपलब्ध होवून मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २०-२-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका